नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. २० मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### महाधिवक्त्यांचा अभिप्राय ठरणार निर्णायक

मुंबई (स. गांवकरी) : राखीव प्रवर्गातील उमेदवारांना शासकीय सेवेत खुल्या जागांवर दावा करता येणार नाही या राज्य मंत्रिमंडळाच्या गेल्या आठवड्यात झालेल्या बैठकीतील निर्णयाचे इतिवृत्त मंजूर करण्यापूर्वी महाधिवक्त्यांचा अभिप्राय घेण्याचा निर्णय मंगळवारी घेण्यात आला. या निर्णयाला काही मंत्र्यांनी विरोध दर्शविला. राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या जागांवर बंदी घालण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत गेल्या आठवड्यात घेण्यात आला होता. हा निर्णयाचे इतिवृत्त मंजुरीला आले असता त्यावर अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ आणि मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विरोध केला. या निर्णयात कोणत्याही त्रुटी राहू नयेत या उद्देशाने महाधिवक्त्यांचा अभिप्राय मागवावा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. राज्य शासनाच्या प्रस्तावित निर्णयानुसार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच इतर राखीव प्रवर्गातील उमेदवारांना गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील पदांवर समायोजित करता येणार नाही. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी, अधिकारी – कर्मचारी संघटना आणि सामाजिक संघटनांकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

### सिंधुदुर्गच्या सागरी पर्यटनात नवा इतिहास

सावंतवाडी (स. गांवकरी) : सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी पर्यटनाला जागतिक नकाशावर नेणारा एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक टप्पा पूर्ण झाला आहे. मालवण-वेंगुर्ला जवळील निवती रॉक समुद्रात भारताचे पहिले अंडरवॉटर म्युझियम (समुद्राखालील संग्रहालय) आणि आर्टिफिशियल रीफ (कृत्रिम समुद्री प्रवाळ) प्रकल्पासाठी भारतीय नौदलाची सेवामुक्त युद्धनौका 'आयएनएस गुलदार' (EX INS Guldar) समुद्रतळाशी यशस्वीपणे विसर्जित करण्यात आली आहे. गेल्या दीड वर्षांपासून विजयदुर्ग येथे विसर्जनाच्या प्रतीक्षेत असलेल्या या युद्धनौकेची अखेर निवती समुद्रात समुद्रतळापासून सुमारे २२ मीटर खोलीवर सुरक्षितपणे स्थापना करण्यात आली असून, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे.

### कोकणात अणुऊर्जा निर्मिती प्रकल्प

मुंबई (स. गांवकरी) : केंद्र सरकारने अणुऊर्जा क्षेत्रात खासगी कंपन्यांना मार्ग उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अलीकडेच केलेल्या 'शांती कायद्या' नुसार अदानी आणि रिलायन्स उद्योग समूह राज्यात अणुऊर्जा प्रकल्प उभारणार आहेत. कोकणात उभारण्यात येणाऱ्या या प्रकल्पांसाठी सामंजस्य करार मंगळवारी करण्यात आले. राज्याची वीज निर्मितीची क्षमता वाढविण्यासाठी तसेच स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यातील गुंतवणूक वाढविण्यासाठी राज्य सरकारने रिलायन्स, अदानी, बजाज आदी उद्योग समूहासोबत सुमारे २५ हजार ४०० मेगावॅट अणुऊर्जा निर्मितीसाठी सामंजस्य करार केले. अदानी कंपनी रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू येथे तर रिलायन्स कंपनी पूर्णागड( रत्नागिरी) येथे तर एनटीपीसी देवगड येथे अणुऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणार आहे. या कंपन्या अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रात ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून जवळपास एक लाख २३ हजा रोजगार निर्मिती होणार आहे. अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना सरकारच्या वतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

# राजस्थान रॉयल्सचा विजय

## वैभव सूर्यवंशीची ९३ धावांची स्फोटक खेळी!

लखनौ : (स. गांवकरी)

लखनौ सुपर जायंट्स विरुध राजस्थान रॉयल्सस यांच्यात अटीतटीचा सामना झाला. या सामन्यात राजस्थान रॉयल्सने लखनौ सुपरजायंट्सवर 7 गडी राखून विजय मिळवला आहे. वैभव सूर्यवंशीच्या स्फोटक खेळीमुळे राजस्थान रॉयल्सने विजय मिळवला आहे. लखनौने 20 षटकांत 5 गडी गमावून 220 धावा केल्या होत्या. लक्ष्याचा पाठलाग करताना, राजस्थानने 19.2 षटकांत 7 गडी राखून विजय मिळवला. वैभव सूर्यवंशीने संघासाठी सर्वोत्तम खेळी केली, त्याने 7 चौकार आणि 10 षटकारांच्या मदतीने 38 चेंडूंमध्ये 93 धावा केल्या. या विजयामुळे राजस्थानने आपल्या प्लेऑफच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. या विजयामुळे राजस्थानचे 13 सामन्यांमधून 14 गुण झाले आहेत. आता, अंतिम सामना जिंकून संघ 16 गुणांपर्यंत पोहोचू शकतो. सध्या, एकमेव प्लेऑफ जागेसाठी पाच संघांमध्ये चुरशीची लढत सुरू आहे. या संघांपैकी, राजस्थान हा एकमेव संघ आहे जो 16 गुण मिळवून थेट प्लेऑफसाठी पात्र ठरू शकतो. राजस्थानचा कर्णधार यशस्वी जैस्वालने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना, लखनौचा सलामीवीर मिचेल मार्शने 57 चेंडूंमध्ये 11 चौकार आणि पाच षटकारांसह 96 धावा करून वादळी खेळी केली. मात्र, वैभवने त्याचा डाव उधळून लावला.



मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करण्याच्या उद्देशाने खेळणाऱ्या राजस्थानने सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवले. यशस्वी जैस्वाल आणि वैभव सूर्यवंशी यांनी 39 चेंडूंमध्ये पहिल्या विकेटसाठी 75 धावांची भागीदारी केली. त्यानंतर वैभवने ध्रुव जुरेलसोबत दुसऱ्या विकेटसाठी भागीदारी करत 45 चेंडूंमध्ये 101 धावा जोडल्या, ज्यामुळे विजय जवळपास एकतर्फी झाला. त्यानंतर जुरेल आणि लेहुआ-ड्रे प्रिटोरियस यांनी तिसऱ्या विकेटसाठी 14 चेंडूंमध्ये 16 धावा जोडल्या. अखेरीस, जुरेल आणि देवनावॉन फरेरा यांनी 17 चेंडूंमध्ये 29 धावांची भागीदारी करून संघाला विजय मिळवून दिला. राजस्थानकडून, वैभव

> लखनौ सुपर जायंट्स आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. दरम्यान, राजस्थान रॉयल्सला प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी हा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागणार होता. आजचा सामना जिंकल्यामुळं राजस्थानच्या आशा पल्लवती झाल्या आहेत.

सूर्यवंशी व्यतिरिक्त, कर्णधार यशस्वी जैस्वालने 43 ध्रुव जुरेलने 53 देवनाव फरेराने 16 आणि लेहुआन-ड्रे प्रिटोरियसने 7धावा केल्या. प्रथम फलंदाजी करताना लखनौ सुपर जायंट्सने 220 धावा केल्या. मिचेल मार्शचे सलग दुसऱ्या डावात शतक हुकले. मार्श 96 धावांवर बाद झाला, पण त्याने आयपीएल 2026 साठी ऑरेंज कॅप जिंकली. राजस्थान रॉयल्सच्या यशराज पुनियाला वगळून सर्व गोलंदाज पूर्णपणे निष्प्रभ ठरले. जयपूरमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात लखनौ संघ प्रथम फलंदाजीसाठी आला. मिचेल मार्श आणि जोश इंग्लिशने संघाला वेगवान सुरुवात करून दिली आणि पहिल्या विकेटसाठी 109 धावांची भागीदारी केली.

## मुंढेंची २५वी बदली, आता अन्न आणि औषध प्रशासनात आयुक्त

### FDA तील भ्रष्ट कारभाराला आळा घालण्याचं आव्हान

मुंबई : (स. गांवकरी)

आपल्या कामाच्या धडाडीमुळे सातत्याने चर्चेत असलेले आणि सातत्याने बदलीचा त्रास सहन करणाऱ्या तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. लाचखोरी आणि इतर भ्रष्ट कामांमुळे चर्चेत असलेल्या अन्न आणि औषध प्रशासनात आता आयुक्त म्हणून तुकाराम मुंढेंची बदली करण्यात आली आहे. तसा आदेश राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने जारी केला आहे.

दीडच महिन्यांपूर्वी तुकाराम मुंढे यांची दिव्यांग विभागातून राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली करण्यात आली होती. आता पुन्हा त्यांची अन्न आणि औषध प्रशासन खात्यात आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्याचं अन्न आणि औषध प्रशासन खातं सातत्याने चर्चेत आहे. या विभागातल्या अधिकाऱ्यांवर सातत्याने भ्रष्टाचाराचे आरोप होताना दिसतात. राष्ट्रवादीचे नेते नरहरी झिरवाळ हे या खात्याचे मंत्री आहेत. काही दिवसांपूर्वी या विभागातील अधिकाऱ्याने मंत्रालयातच लाच घेतल्याचा प्रकार घडला होता. लाचलुचपत विभागाने मंत्रालयातच त्याला अटक करत कारवाई केली होती. अन्न



आणि औषध प्रशासन खात्यावर सत्ताधारी भाजपचे आमदारही नाराज असल्याचं दिसून येतंय. अनेकदा तक्रारी करूनही या विभागाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही असा तक्रारीचा सूरही त्यांनी गेल्या वेळच्या अधिवेशनामध्ये मांडला होता. त्याचवेळी या विभागातील अनेक अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभार मात्र सुरूच असल्याची दबक्या आवाजात चर्चा असते.

आपल्या शिस्तप्रिय आणि धडाकेबाज कामासाठी प्रसिद्ध असलेले तुकाराम मुंढे आता या खात्याचे नवे आयुक्त असणार आहेत. या आधी तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण विभागात आयुक्त म्हणून काम करताना मोठी कारवाई केली होती. बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून सरकारी नोकरी मिळवलेल्या शेकडो कर्मचाऱ्यांवर त्यांनी निलंबनाची कारवाई केली होती.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू

परभणी : (स. गांवकरी)

परभणी जिल्ह्यातील पाथरी-माजलगाव महामार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. पाथरी-माजलगाव राष्ट्रीय महामार्गावर ढालेगावजवळील रामपुरी खुर्द शिवारात ही घटना घडली. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

या प्रकरणी पाथरी पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनधारकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अज्ञात वाहनाने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पाथरी पोलीस ठाण्यात अज्ञात वाहनधारकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माजलगाव



तालुक्यातील रेनापुरी येथील 28 वर्षीय रवींद्र शिवाजी घडशिंगे व 22 वर्षीय विशाल शिवाजी घडशिंगे हे दोघे सख्खे भाऊ मानवत येथे नातलगांना भेटण्यासाठी गेले होते. नातलगांची भेट घेऊन ते आपल्या मोटारसायकलवरून (एमएच 44 एबी 2625) पाथरी मार्गे रेनापुरीकडे परतत होते. दरम्यान, ढालेगाव-पाथरी दरम्यान रामपुरी खुर्द शिवारात त्यांच्या दुचाकीला भरधाव अज्ञात वाहनाने जोराची धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

## मोदी देशाची प्रतिष्ठा जपतात, राजकीय आरोप करायचे नसतात

मुंबई : (स. गांवकरी)

भारताच्या बाहेर देशाची प्रतिष्ठा जपण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी करतात ही गोष्ट आपल्याला विसरुन चालणार नाही. जिथे देशाची प्रतिष्ठा असते तिथं राजकीय आरोप करायचे नसतात असं मत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी व्यक्त केलं. पुण्यातील लक्ष्मणराव गुट्टे रूरल डेव्हल्पमेंट फाऊंडेशन आयोजित युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या आजी माजी पदाधिकाऱ्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी शरद पवारांनी पंतप्रधान मोदींच्या कामाचं कौतुक केलं.

शरद पवार म्हणाले की, "नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत. काही राजकीय विचारांच्या संबंधी माझी आणि त्यांची भूमिका वेगळी असू शकते. पण आज भारताच्या बाहेर देशाची प्रतिष्ठा जपण्याचं काम मोदी करतात ही गोष्ट आपल्याला विसरुन चालणार नाही. जिथे देशाची प्रतिष्ठा येते तिथे राजकीय आरोप करायचे नसतात." मुंबईतील मराठी

### शरद पवारांकडून पंतप्रधानांचं कौतुक




पत्रकार संघाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला एकेकाळी युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे नेतृत्व केलेले मंत्री उदय सामंत, मंत्री प्रकाश आबिटकर, मंत्री जयकुमार रावल, रणजितसिंह मोहिते पाटील, खासदार संजय पाटील, धैर्यशील माने, नरेंद्र भोडेकर, अतुल भोसले असे अनेक नेतेमंडळी उपस्थित होते.

या कार्यक्रमात बोलताना शरद पवार म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील युवक काँग्रेसच्या आजी माजी पदाधिकारी यांचा हा कार्यक्रम आहे. इंदिरा गांधींमुळे आम्हाला युवक दशेत पक्षात काम करण्याची प्रेरणा मिळाली. सुरुवातीला मी बारामती युवक काँग्रेसचा प्रमुख झालो. पुढे चार वर्षांनी महाराष्ट्राचा प्रमुख झालो.

यावेळी जुन्या आठवणी सांगताना शरद पवार पुढे म्हणाले की, "काँग्रेसमध्ये काम करत असताना आम्ही पंडित नेहरुंना भेटण्याची विनंती केली. पंडित नेहरुंना भेटायचे आणि त्यांच्यासमोर शेतकऱ्यांचे आणि इतर प्रश्न मांडायचं असं ठरवलं. पण पंडित नेहरु समोर आले आणि आम्ही काय बोलायचं ते विसरून गेलो." इंदिरा गांधी यांच्याबाबत आठवण सांगताना शरद पवार म्हणाले की, "इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान झाल्या. रशिया दौऱ्यावर त्या गेल्या असता तिथल्या राष्ट्रपतींनी त्यांचं स्वागत केलं नाही. इंदिरा गांधी त्यावेळी तिथल्या लहान मुलांसोबत खेळायला लागल्या. ते पाहून राष्ट्रपतींना गांधींचे स्वागत केलं नसल्याची चूक लक्षात आली. इंदिरा गांधी यांच्यासोबत काम काम करण्याची संधी मिळाली हे आमचे भाग्य."

## मतदार नसल्याने जिल्हा परिषद, भिंगार छावणी

# कार्यक्षेत्रातील आचारसंहितेची अंमलबजावणी

### निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शन मागवले

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जिल्हा परिषद, पंचायत समिती व भिंगार छावणी मंडळाच्या निवडणुका झाल्या नसल्याने तेथील सदस्य विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदार नाहीत. त्यामुळे या संस्थांच्या क्षेत्रात आचारसंहिता अंमलबजावणी करायची की नाही याचे मार्गदर्शन केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मागण्यात आले आहे. त्याची प्रतीक्षा असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले.

आचारसंहितेमुळे जिल्ह्यातील सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदल्या तसेच पदोन्नतीचे कार्यक्रम थांबवण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या स्पष्टीकरणाकडे लक्ष लागलेले आहे. दरम्यान शिर्डी येथे २३ मे रोजी संरक्षण मंत्री राजनाथसिंह व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत संरक्षण साहित्य प्रकल्पाचे उद्घाटन होत आहे. मात्र या कार्यक्रमाला आचारसंहितेची बाधा नाही, कारण हा कार्यक्रम खाजगी कंपनीचा आहे, असेही त्यांनी सांगितले.

विधान परिषदेची निवडणूक जाहीर झाली आहे. २५ मे रोजी या निवडणुकीसाठी अधिसूचना जारी होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. जिल्ह्यातील सर्व १४ तहसील कार्यालयात मतदान केंद्र असणार आहेत तर मतमोजणी २२ जूनला अहिल्यानगर शहरात होणार आहे.

जिल्ह्यातील १८ स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी १५ संस्थांचे ४६१ सदस्य मतदार आहेत. त्यामध्ये निवडून आलेले ४२० व स्वीकृत ४१ आहेत. मात्र जिल्हा परिषदेचे ७५, पंचायत समिती सभापती १४ व भिंगार छावणी मंडळाचे ७ यांच्या निवडणुका झाल्या नसल्याने ९६ सदस्य मतदार नाहीत. त्यामुळे तेथे आचारसंहितेची अंमलबजावणी




**मतपत्रिकांचा वापर :** विधान परिषदेच्या निवडणुकीतील मतदानासाठी मतपत्रिकांचा वापर केला जाणार आहे. उमेदवारांना पसंतीक्रमानुसार मतदान करावे लागणार आहे. त्यासाठी विशिष्ट पेन प्रत्येक मतदान केंद्रावर भारत निवडणूक आयोगाकडून उपलब्ध केला जाणार आहे. मतपेटीसाठी 'जम्बो बॅलेट बॉक्स'ची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून स्वतंत्र निवडणूक निरीक्षकाची नियुक्ती केली जाणार आहे.

करायची का, याचे मार्गदर्शन निवडणूक आयोगाकडे मागण्यात आले आहे. आचारसंहितेमुळे कर्मचाऱ्यांच्या बदल्या तसेच पदोन्नतीचे कार्यक्रम थांबवण्यात आले आहेत. आचारसंहितेमुळे पक्षय झेंडे, फलक हटवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. मालमत्ता विद्रूपीकरण प्रकरणात गुन्हे दाखल केले जाणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पुरस्कार जाहीर

### स्वाती चिटणीस आणि दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव

मुंबई : (स. गांवकरी)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मध्यवर्ती मुंबईतर्फे दरवर्षी नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी यंदाच्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षी ज्येष्ठ अभिनेत्री स्वाती चिटणीस आणि ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ रविवार, 14 जून रोजी दुपारी 4 वाजता मुंबईतील यशवंत नाट्य मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात मराठी रंगभूमीवरील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलाकार, तंत्रज्ञ आणि कार्यकर्त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. मराठी रंगभूमी, चित्रपट आणि दूरदर्शन क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल स्वाती चिटणीस आणि दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या दोन्ही कलाकारांनी आपल्या बहुआयामी अभिनयातून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. व्यावसायिक



नाट्य पुरस्कारांमध्ये प्राजक्त देशमुख यांना सर्वोत्कृष्ट लेखक, अमेय दक्षिणदास यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, तर सकर्षण कराडे यांना सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार जाहीर झाला आहे. पर्ण पेठे यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार मिळणार आहे. 'बोलविता धनी' या नाटकाला सर्वोत्कृष्ट व्यावसायिक संगीत नाटकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. ओंकार प्रभुघाटे यांना सर्वोत्कृष्ट गायक अभिनेता, तर संपदा माने यांना सर्वोत्कृष्ट गायक अभिनेत्री म्हणून गौरविण्यात येणार आहे. प्रायोगिक नाट्य विभागात 'कर्ण' या नाटकाला सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटक, तर 'संगीत पद्माराणी'ला सर्वोत्कृष्ट प्रायोगिक संगीत नाटकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. आशुतोष वाघमारे, इरफान मुजावर आणि आश्विनी आंचवले यांचाही सन्मान होणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### उन्हाळी कबड्डी प्रशिक्षण शिबिराचे थाटात उद्घाटन

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, महादजी शिंदे विद्यालय श्रीगोंदा आणि नेवासा तालुका हौशी कबड्डी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या उन्हाळी कबड्डी प्रशिक्षण शिबिराचे उत्साहपूर्ण वातावरणात उद्घाटन करण्यात आले. हे शिबिर १५ मे ते १४ जून या कालावधीत एक महिना चालणार असून, यामध्ये एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. शिबिराचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. बाबासाहेब भोस यांच्या हस्ते झाले. यावेळी महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य मा. दिलीप भुजबळ, प्राचार्य मा. शहाजी मखरे, राष्ट्रीय पंच मा. मुकेश श्री तसेच आत्माराम नगरे पोलीस उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे होते. उद्घाटनपर भाषणात मा. बाबासाहेब भोस यांनी खेळ आणि जीवन यांची योग्य सांगड घालून व्यक्तिमत्त्व विकास कसा साधता येतो, याविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रकाश साळवे यांनी कबड्डी खेळाचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास सिनिअर कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, प्रा. बुलाखे, प्रा. बहिरम, प्रा. फटे, प्रा. मगर, प्रा. पवार, प्रा. श्रीमती बांदरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शिबिराचे नियोजन क्रीडा संचालक प्रा. संजय डफळ व संदीप बिरंगळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. सचिन झगडे यांनी केले तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक मा. रत्नाकर झिटे यांनी मानले.



### १८ दिव्यांग जोडपे विवाहबध्द

रावेर (स. गांवकरी) : रावेर येथिल दिव्यांग जनकल्याण बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयोजित केलेल्या पहिला दिव्यांग सामूहिक विवाह सोहळा दिनांक 17 /5/2026 रविवार रोजी दत्तगुरु हॉल माऊली फार्म हाऊस रावेर येथे संपन्न झाला . त्यावेळी उपस्थित मान्यवर आमदार श्री अमोल भाऊ जावळे , नंदकिशोर महाजन लोकसभा प्रमुख , डॉक्टर संदीप पाटील माऊली हॉस्पिटल योगिता संदीप पाटील ,उद्योजक श्रीराम पाटील कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रल्हाद भाऊ पाटील , नगराध्यक्ष संगीता महाजन , पद्माकर महाजन , दिव्यांग प्रतिनिधी मुकुंद गोसावी , जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रप्रमुख एस पी गणेश कर साहेब ,जी टी महाजन सर ,सी एस पाटील सर, त्याच प्रमाणे रावेरच्या तहसिलदार मॅडम व मान्यवर हजर होते . तसेच दिव्यांगावर प्रेम करणारे सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी दिव्यांग जनकल्याण बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष संजय दिनकर बुवा , उपाध्यक्ष घनश्याम प्रभाकर हरणकर , खजिनदार रजनीकांत शामराव बारी सचिव विशाल कासार संदीप पाटील , प्रवीन धनगर , दिलीप जैन कैलास महाजन , ज्योती रजनीकांत बारी,विजय वारी रमेश एकनाथ चौधरी , बाळू महाजन विनोद चव्हाण , महेश महाजन पुंडलिक महाजन, योगेश महाजन , महेश गजेश्वर गजानन बारी , नारायण लोणारी , भूषण महाजन, प्रदीप परदेशी एडवोकेट रमाकांत महाजन, एडवोकेट योगेश चौधरी , एडवोकेट विनोद चौधरी , अशोक पाटील,नाना मोची नितीन महाजन, मुन्ना चौधरी ललित कोल्हे ,आधी सर्व मान्यवर उपस्थित होते. केसरी कट्टा , मित्रपरिवार उमाइ फाउंडेशन , सूर्यवंशी बारी समाज , रावेर व रावेर शहर तेली समाज पंचमंडळ , आधी सर्व मान्यवर उपस्थित होते.




### गिरीश महाजान यांच्या वाढ दिवसावसा निमित्त आरोग्य तपासणी शिबीर

रावेर (स. गांवकरी) : रावेर तालुक्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या निंभोरा तालुका रावेर येथे कृषी तंत्र विद्यालयात नामदार संकटमोचक आदरणीय श्री गिरीश भाऊ महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त श्री मनोज भाऊ सोनार व साई मित्र परिवारातर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात उत्तम प्रतिसाद मिळाला. गोदावरी फाउंडेशनचे आदरणीय श्री डॉक्टर उल्हास पाटील. आदरणीय डॉक्टर केतकी पाटील यांच्या डॉक्टरांची तज्ञ टीम यांनी रुग्णांची तपासणी केली. व त्यांचे अनमोल सहकार्य लाभले यावेळी श्री सुरेश भाऊ धनके. श्री नंदू भाऊ महाजन. श्री पिंटू भाऊ राणे. श्री सागर होले. श्री अरुण शिंदे श्री प्रल्हाद भाऊ बोंडे. श्री अनिल बऱ्हाटे श्री प्रमोद भाऊ कोंडे. व मान्यवर पत्रकार बंधू प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर हर्षल पाटील ( वाघ) डॉक्टर आर के पाटील डॉक्टर एस डी चौधरी. डॉक्टर विजय पाटील यांचे सुद्धा अनमोल सहकार्य लाभले. तसेच सर्व साई मित्र मंडळ व कृषी तंत्र विद्यालयाचे अध्यक्ष श्री प्रल्हाद भाऊ बोंडे. उपप्राचार्य श्री विवेक बोंडे श्री रोशन बोंडे. कृषी विद्यालयाचा सर्व स्टॉप यांचे सुद्धा अनमोल सहकार्य लाभले.

### व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटीचा आर्थिक कामगिरीत मोठी झेप



पुणे (स. गांवकरी) : व्हेंटिव्ह हॉस्पिटॅलिटी लिमिटेडने मार्च २०२६ अखेरच्या तिमाही आणि संपूर्ण आर्थिक वर्षातील आर्थिक निकाल जाहीर करत महसूल, कार्यकारी नफा आणि निव्वळ नफ्यात मोठी वाढ नोंदवली आहे. मार्च २०२६ अखेरच्या तिमाहीत कंपनीचे एकत्रित उत्पन्न ८७० कोटी रुपये झाले असून त्यात वार्षिक तुलनेत २१ टक्के वाढ झाली आहे. कार्यकारी नफा ४७६ कोटी रुपयांवर पोहोचला असून त्यात २८ टक्के वाढ झाली. या तिमाहीत कंपनीचा निव्वळ नफा २५९ कोटी रुपये राहिला असून त्यात ७२ टक्के वाढ झाली आहे. संपूर्ण आर्थिक वर्षात कंपनीचे एकत्रित उत्पन्न २ हजार ६६६ कोटी रुपये झाले. वार्षिक कार्यकारी नफा १ हजार २९९ कोटी रुपये नोंदवला गेला असून त्यात २८ टक्के वाढ झाली आहे. कंपनीचा वार्षिक निव्वळ नफा ५०२ कोटी रुपयांवर पोहोचला असून मागील आर्थिक वर्षातील ४८ कोटी रुपयांच्या तुलनेत त्यात तब्बल ९३९ टक्के वाढ झाली आहे. कंपनीच्या आदरातिथ्य व्यवसायातून मार्च तिमाहीत ६५८ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. या विभागाचा कार्यकारी नफा २९५ कोटी रुपये राहिला. भू-राजकीय तणाव आणि प्रवासावरील निर्बंधांचा या विभागावर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे कंपनीने म्हटले आहे.

# पाणलोट क्षेत्रात वाढ होणे गरजेचे : मंत्री विखे

## आम्ही टाकळीकर व नाम फाऊंडेशनच्या जलसंधारण कामाचा शुभारंभ

पारनेर : (स. गांवकरी)

वाढत्या तापमानामुळे पाण्याची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. त्यामुळे जलसंवर्धन चळवळ राबवून पाणलोट क्षेत्रात वाढ होणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्ही टाकळीकर व नाम फाऊंडेशनने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान व नाम फाऊंडेशन यांच्या वतीने टाकळी ढोकेश्वर येथे राबविण्यात येणाऱ्या जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ मंत्री विखे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार काशिनाथ दाते होते.

स्वागत सरपंच तथा प्रशासक अरुणाताई खिलारी यांनी केले. आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक चाँद शेख यांनी प्रतिष्ठानने बारा वर्षात राबविलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. या जलसंधारण कामात आम्ही टाकळीकर व नाम फाऊंडेशन सोबत सकाळ रिलीफ फंड, टाटा मोटर्स, पारनेर तालुका पत्रकार संघ, ग्रामपंचायत, सेवा सहकारी सोसायटी, ढोकेश्वर सैनिक फाऊंडेशन, सावली प्रतिष्ठान यासह विविध संस्था व ग्रामस्थ सहभागी होणार आहेत.

मंत्री विखे म्हणाले, पाण्याचा संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे कायमस्वरूपी पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. नजीकच्या राळेगण सिद्धी व हिवरे बाजार गावात अण्णा हजारे व पोपटराव पवार यांनी लोकसहभागातून जलक्रांती घडवून आणली. असे काम प्रत्येक गावात होणे गरजेचे आहे.

दुष्काळमुक्त करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्यावर सोपवली आहे. त्यामुळे पाणी प्रश्न सोडविण्यासाठी माझा नेहमी प्रयत्न राहील. दुष्काळ कायमचा संपायला हवा यासाठी जलशिवार अभियान प्रभावीपणे राबविले जाईल.

आमदार दाते यांनी तालुक्यात जलसंधारण कामे मोठ्या प्रमाणात सुरू असून त्यांना शासन सर्व सहकार्य करेल अशी भूमिका यावेळी मांडली. यावेळी आम्ही



टाकळीकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब बांडे, नाम फाऊंडेशनचे विशाल नगरे, टाटा मोटर्सचे प्रसाद जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे, वसंत चेडे, राहुल शिंदे, विनायक देशमुख, जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे माजी अध्यक्ष रावसाहेब रोहोकले , सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी, बाजार समितीचे माजी सभापती प्रशांत गायकवाड, माजी उपसभापती विलास झावरे, संचालक अशोकशेठ कटारिया, सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे, व्हा. चेअरमन मोहन रांधवण, माजी सरपंच शिवाजी खिलारी, संजय उदावंत, लताताई आल्हाट, ढोकेश्वर सैनिक फाऊंडेशनचे अध्यक्ष दिगंबर शेळके, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, पारनेर तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष शरद झावरे, सनी सोनवणे, आम्ही टाकळीकर प्रतिष्ठानचे विश्वस्त संदीप कोरडे, स्थानिक समन्वयक संतोष सोनावळे, प्रताप खिलारी , संदीप खिलारी , आदिनाथ पायमोडे, शुभम गोरडे, अक्षय गोरडे, बाळशिराम पायमोडे, दादाभाऊ नवले, मंगेश खिलारी , संजय झावरे, गणेश चव्हाण, धनंजय आल्हाट, गणेश गायकवाड आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री समर्थ कृपा भजन मंडळाचा १६ वा वर्धापनदिन ७ जूनला

ठाणे : (स. गांवकरी)

वारकरी परंपरेतील भक्तिभाव, नामस्मरण आणि सामूहिक साधनेचा जागर जपणाऱ्या श्री समर्थ कृपा भजन मंडळ, नालासोपारा (विरार) यांचा १६ वा वर्धापनदिन सोहळा रविवार दि. ७ जून २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील नामवंत मुक्ताई कृपांकित ह.भ.प. विशाल महाराज खोले (मुक्ताईनगर) यांचे प्रभावी आणि समाजप्रबोधनपर कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. हा भक्तिमय सोहळा मोरेश्वर विद्यालयाजवळ, मोरेगाव नाका, विरार रोड, नालासोपारा (पूर्व), ता. वसई, जि. पालघर येथे पार पडणार असून, कार्यक्रमात स्वरअलंकार ह.भ.प. महेश्वरजी भगुरे गुरुजी (आळंदी) तसेच मृदुंग महामेरू ह.भ.प. कृष्णा महाराज भोरकडे (परभणी) यांची साथसंगत लाभणार आहे. संतांची शिकवण आणि



भक्तीचा सोहळा या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात दिवसभर विविध आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजता श्री सत्यनारायण महापूजा, सकाळी ८ वाजता दीपप्रज्वलन सामूहिक पालखी सोहळा होणार आहे. तसेच सकाळी ९.४३ वाजता विरार ते चर्चगेट विशेष गाडीची वेळ जाहीर करण्यात आली आहे.

## संगीतमय श्रीमद्भागवत सप्ताहज्ञानयज्ञाला उत्स्फूर्त प्रतिसाद!

### समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांची उपस्थिती; जिग्नेशभाई महाराजांच्या निरूपणाने भाविक मंत्रमुग्ध!

ठाणे : (स. गांवकरी)

घोडबंदर रोड परिसरातील श्री राम मंदिर येथे १८ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या संगीतमय श्रीमद्भागवत सप्ताहज्ञानयज्ञाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी कपिल जन्म प्रसंगाचे भावपूर्ण निरूपण करण्यात आले. यावेळी समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या धार्मिक सोहळ्यात कथावाचक जिग्नेशभाई जयेशभाई जोशी, आयोजक जयेशभाई पांचाळ, हर्षाबेन पंचाल, मीनाबेन दैया, दक्षाबेन पंड्या, रिनाबेन ठक्कर, आरतीबेन राठोड, भावनाबेन पंचाल, शारदाबेन पंचाल, रेखा शाह, जयश्रीबेन जोटाणिया, चंद्रिकाबेन पटेल, श्री राम महिला मंडळ तसेच मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.




कथावाचक शास्त्रीजी जिग्नेशभाई जोशी महाराज यांनी श्रीमद्भागवताचे महत्त्व विशद करताना सांगितले की, “भगवद्भागवत हे केवळ ग्रंथ नसून जीवन जगण्याची दिशा देणारे दिव्य शास्त्र आहे. यात भक्ती, ज्ञान आणि वैराग्य यांचा सुंदर संगम आहे. श्रद्धेने भागवत श्रवण करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात शांती, समाधान आणि सकारात्मकता निर्माण होते.” त्यांनी पुढे सांगितले की, भागवत कथा ऐकणे म्हणजे आत्मशुद्धीचा मार्ग असून प्रत्येकाने ते आपल्या दैनंदिन जीवनात आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यांच्या प्रभावी निरूपणामुळे उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. यावेळी समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, “श्रीमद्भागवत कथा हे जीवनाला योग्य दिशा देणारे माध्यम आहे. प्रत्येकाने भागवत घरी नेऊन त्यातील उपदेश जीवनात आचरणात आणावेत.” त्यांनी महाराजांच्या शिकवणी प्रेरणादायी असल्याचे सांगत सर्व भाविकांना सात दिवस चालणाऱ्या सप्ताहात सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांनी जिग्नेश महाराजांना शाल अर्पण करून सत्कार केला. तसेच जिग्नेश महाराज यांनीही नानजीभाई ठक्कर यांचा शाल देऊन गौरव केला.

## कॉन्स्टेबल वैशाली पन्हाळे झाल्या पीएसआय

राजूर : (स. गांवकरी)

"वेळेची किंमत कोणाला विचारावी? ज्याचं यश अवघ्या एका सेकंदाने हुकलंय त्याला! संगमनेरच्या शिवाजीनगर भागात राहणाऱ्या वैशाली हरिदास पन्हाळे यांच्या बाबतीत नेमकं हेच घडलं होतं. पण त्या एका सेकंदाने त्यांना हरवलं नाही, तर अधिक बलवान बनवलं." "सन २०१२ मध्ये अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलात त्या कॉन्स्टेबल म्हणून भरती झाल्या. नोकरीची खडतर जबाबदारी आणि संसाराचा गाडा ओढत त्यांनी जिद्दीने ग्रॅज्युएशन पूर्ण केलं. पोलीस खात्यात १४ वर्षं प्रामाणिक सेवा बजावल्यानंतर, २०२१ मध्ये त्यांनी खात्यांतर्गत पीएसआय पदाची परीक्षा दिली. मात्र, शारीरिक चाचणीत अवघ्या 'मायक्रो तीन सेकंदांमुळे' त्यांचे ४ मार्क कापले गेले आणि त्या मेरिटमधून बाहेर पडल्या. पीएसआय बनण्याचं स्वप्न डोळ्यासमोरून जाताना पाहून कोणीही खचलं असतं, पण वैशाली मॅडम वेगळ्या मातीतल्या होत्या."



**कॉन्स्टेबल ते पीएसआय एक प्रेरणादायी प्रवास**

"त्यांना त्या दिवशी आयुष्यात 'मायक्रो सेकंदाची' खरी किंमत कळाली. घर, कुटुंब आणि पोलीस दलातील कर्तव्य सांभाळून अभ्यासाचा ताळमेळ घालणं सोपं नव्हतं. पण, 'यावेळी कोणत्याही परिस्थितीत यशस्वी व्हायचंच' ही जिद्द त्यांना शांत बसू देत नव्हती. अपयशाच्या दुसऱ्याच दिवसापासून त्यांनी पुन्हा जोमाने सुरुवात केली. त्यांना साथ लाभली ती कुटुंबाच्या आशीर्वादाची आणि पोलीस खात्यातील वरिष्ठांच्या मोलाच्या मार्गदर्शनाची.

"विशेषतः मैदानी चाचणीतील तो 'मायक्रो सेकंदाचा' अडथळा दूर करण्यासाठी त्यांना बळ मिळालं ते 'एस के फिटनेस क्लब'कडून. संचालक सागरजी खालकर यांनी वैशाली मॅडमचा सराव इतका कडक करून घेतला की, ज्या मैदानी चाचणीने त्यांना एकदा हरवलं होतं, त्याच चाचणीत त्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवून इतिहास घडवला! त्यांच्या या यशाचं मोठं श्रेय त्या खालकर सरांच्या मार्गदर्शनाला देतात. "कॉन्स्टेबल ते थेट पोलीस उपनिरीक्षक... वैशाली पन्हाळे यांचा हा थक्क करणारा पण प्रेरणादायी प्रवास आज लाखो महिलांसाठी आणि पोलीस दलातील सहकाऱ्यांसाठी एक दीपस्तंभ ठरला आहे. "जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर अशक्य ही शक्य करून दाखवणाऱ्या वैशाली पन्हाळे यांचं आज संपूर्ण जिल्ह्यात कौतुक होत आहे."

## आगासन गावातील आरक्षण सर्व्हे प्रक्रियेला स्थगिती



ठाणे, दिवा : (स. गांवकरी)

मौजे आगासन, सेक्टर १० येथील प्रस्तावित DP रोड व हॉस्पिटल आरक्षणाच्या अनुषंगाने सुरू करण्यात आलेल्या मोजणी / सर्व्हे प्रक्रियेस आगासन ग्रामस्थांनी तीव्र हरकत घेतली होती. ठाणे महानगरपालिकेचा नवीन विकास आराखडा (DP Plan) अद्याप अंतिम मंजूर व अधिसूचित झालेला नसताना सुरू करण्यात आलेली ही प्रक्रिया कायदेशीरदृष्ट्या चुकीची असल्याचा मुद्दा आगासन गाव बचाव संघर्ष समितीच्या वतीने ठामपणे मांडण्यात आला. या संदर्भात आगासन गाव बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष ॲड. रोहिदास मुंडे यांच्या नेतृत्वाखाली उदय मुंडे, प्रवीण म्हात्रे, निलेश मुंडे यांनी ठाणे महानगरपालिका आयुक्त यांच्यासोबत सकारात्मक चर्चा पार पडली. यावेळी आयुक्तांनी शेतकरी व ग्रामस्थांना योग्य न्याय देण्याचे आश्वासन देत सदर सर्व्हे / मोजणी प्रक्रियेस तात्पुरती स्थगिती दिली.

# आंदोलन करणाऱ्या रवींद्र राजदेव यांच्यासह १५ जणांवर गुन्हे

पारनेर : (स. गांवकरी)

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी राष्ट्रीय महामार्गावर करण्यात आलेल्या भव्य ‘रस्ता रोको’ आंदोलनामुळे आता आंदोलकांवर कायदेशीर कारवाई झाली आहे. नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावरील टाकळी ढोकेश्वर येथे शेतकऱ्यांनी घेतलेल्या या आंदोलनामुळे वाहतूक काही मिनिटे ठप्प झाली होती. या प्रकरणी पारनेर पोलिसांनी आंदोलनाचे नेतृत्व करणारे नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजाराम राजदेव यांच्यासह १५ प्रमुख नेते व कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल केले आहेत. त्याशिवाय ४० ते ५० अज्ञात आंदोलकांवरही गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय महामार्ग अडवून वाहतुकीस



अडथळा निर्माण करणे, जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणे आणि विनापरवाना आंदोलन आयोजित करणे या आरोपांखाली ही कारवाई करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी शांततेने सुरू असलेल्या आंदोलनाला पोलिसांनी दिलेल्या या प्रतिसादाने स्थानिक राजकीय वातावरण तापले आहे.

पारनेर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांमध्ये नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजाराम राजदेव, काताळवेढा येथील पोपट गुंड, भोंद्रे येथील सरपंच अभिजित झावरे, सरपंच प्रकाश गाजरे, बाबासाहेब बांडे, टाकळी ढोकेश्वरचे दत्तात्रय झावरे, सावरगावचे संतोष चिकणे, निघोजचे जालिंदर लंके, नितीन खोडदे, खडकवाडीचे संतोष शिंदे, चोंभूतचे दादाभाऊ खांडकर, रफिक शेख, कासारे येथील पोपटराव नरड, सतीश भालेकर आणि नांदूर पठारचे रवींद्र बबन चौधरी यांचा समावेश आहे. या सर्व प्रमुख नेत्यांसह इतर अनेक आंदोलकांवरही गुन्हे दाखल झाले आहेत. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, कांदा उत्पादकांना हमी भाव, सिंचन सुविधा, कर्जमाफी, खते-बियाण्यांच्या दरात कपात, वीज बिलात सवलत आदी विविध प्रलंबित मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले होते. महामार्गावरील रस्ता रोकोमुळे परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. मात्र आंदोलन पूर्णपणे शांततेत पार पडल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. तरीही पोलिसांनी मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल करून शेतकऱ्यांच्या आवाजाला दाबण्याचा प्रयत्न केल्याची टीका होत आहे.

शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या रवींद्र राजदेव आणि कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करणे हा अन्याय आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वतः या आंदोलनाची दखल घेतली असताना, पोलिसांनी केलेली ही कारवाई दुर्दैवी आहे. आम्ही या कारवाईचा तीव्र निषेध करतो. सरकारने शेतकऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केल्यास, आगामी काळात पूर्ण पारनेर तालुक्यात आणि जिल्ह्यात तीव्र राजकीय पडसाद उमटतील आणि हे आंदोलन आणखी तीव्र केले जाईल, असा इशारा शेतकरी संघटना व स्थानिक नेत्यांनी दिला आहे.

या प्रकरणी शेतकरी संघटनांनी सरकारला खडेबोल सुनावले आहेत. “शेतकरी हा देशाचा कणा आहे. त्यांच्या समस्या सोडवण्याऐवजी त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे हे शेतकरीविरोधी धोरण आहे,” असे मत व्यक्त करत संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आंदोलनकर्ते आता न्यायालयीन लढाई लढण्यास तयार असल्याचे सांगत आहेत.

दरम्यान, पारनेर पोलिस स्टेशनमध्ये नोंदवलेल्या गुन्ह्याची तपासणी सुरू असल्याचे पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले. या कारवाईमुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, भविष्यात आंदोलन अधिक व्यापक स्वरूप घेईल अशी शक्यता वर्तवली जात आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारने गांभीर्याने पाहिले तरच परिस्थिती शांत होऊ शकेल, असे स्थानिक निरीक्षकांचे मत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## आंबेवाडी येथे २४ मे पासून अंबिका माता बोहाडा उत्सव



आंबेवाडी (स. गांवकरी) : इगतपुरी तालुक्यातील आंबेवाडी येथे ५ दिवसीय अंबिका माता बोहाडा उत्सव होणार आहे. रविवारी २४ मे रोजी लहाना बोहाडा, सोमवारी २५ मे रोजी मोठा बोहाडा होणार आहे. मंगळवारी २६ मे रोजी अंबिका मातेची भव्य मिरवणुक आणि दुपारी जंगी कुस्त्या होणार आहे. गेल्या अनेक वर्षांची परंपरा व संस्कृतीचे प्रतीक मानला जाणारा हा उत्सव 'बोहाडा' म्हणून ओळखला जातो. अंगाला झोंबणारा गार वारा, गडद अंधारातही चैतन्यदायी प्रकाश देणारे टेंभे, संबळ, पिपाणी आणि डफ अशा पारंपरिक कर्णमधुर वाद्यांच्या तालावर लयबद्ध पदन्यास करीत नृत्य करणारी विविध देवदेवतांची सोंगे आणि शेवटी मोठ्या भक्तिमय वातावरणात निघालेल्या देवीच्या सोंगाची घरोघर पूजा करणारे ग्रामस्थ अशा आगळ्यावेगळ्या वातावरणात गेली अनेक वर्ष आंबेवाडी गावाने वर्षानुवर्ष जपलेली ही परंपरा आहे. पर्जन्याच्या आर्जवासाठी ग्रामीण भागात पूर्वीपासून हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. मुखवट्यांचे नृत्य किंवा मुखवटेधारी सोंग म्हणजे 'बोहाडा' हा आदिवासी महादेव कोळी समाज आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. निसर्गाशी संबंधित अनेक देव देवतांचे मुखवटे व वेश परिधान करून पारंपरिक वाद्य असलेले संबळ व पीपाण्यांच्या तालावर मिरवणूक काढली जाते. टेंभे पेटवून त्या उजेडात सकाळपर्यंत ही सोंगे नाचवली जातात. कागदाचा लगदा व जंगली झाड पाला वापरून देव दानवांचे मुखवटे तयार केलेले असतात. शेवटच्या दिवशी सोंगांची मिरवणूक काढली जाते. त्यानंतर जगदंबा व महिषासुराच्या युद्धात वध करून विजयी जगदंबा देवीच्या मिरवणुकीने यात्रेची सांगता होते. बोहाडा महोत्सव शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी पंच कमिटी, ग्रामपंचायत आदी प्रयत्नशील आहे.

## भक्ती शक्ती मंदिरात एक दिवसीय गुरुचरित्र पारायण सोहळा

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील डुंबरवाडीतील श्री स्वामी समर्थ भक्ती शक्ती मंदिर, ह.भ.प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा संस्था यांच्या वतीने गुरुवार दि. २१ मे २०२६ रोजी अधिक मास या पवित्र महिन्याच्या शुभपरवावर व गुरुपुष्यामृत योगावर एकदिवसीय गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सकाळी ७:३० ते ८ वा. भुपाळी आरती, सकाळी ८ ते १०:१५ वा. गुरुचरित्र सामुदायिक पारायण, सकाळी १०:३० ते ११:०० वा. स्वामींची महाआरती, सकाळी ११ ते १२ वा. सामुदायिक पारायण, दुपारी १२ ते १ वा. महाप्रसाद, दुपारी १ ते ६ वा. सामुदायिक पारायण, सायंकाळी ६:३० ते ७ वा. महाआरती, सायंकाळी ७ वा. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे. पारायण नेतृत्व सौ. प्रियंका सचिन हाडवळे, सौ. अपेक्षा दत्तात्रय गोरे हे करणार आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ह.भ.प. विठ्ठल महाराज शितोळे (सर)हे करणार असून कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. नानजीभाई ठक्कर (ज्येष्ठ समाजसेवक, दानशूर व्यक्तिमत्व समाजरत्न व अध्यक्ष एनकेटी चॅरीटेबल ट्रस्ट) व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस श्री. विश्वासराव आरोटे यांची राहणार असल्याचे ह. भ. प. चंद्रकांत महाराज डुंबरे सेवा संस्था, संस्थापक / अध्यक्ष माळशेज नागरी सहकारी पतसंस्था यांनी सांगितले. तरी या सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## बेल्हेकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तंत्रनिकेतनमध्ये सुविधा केंद्रास मान्यता

भानसहिवरे (स. गांवकरी) : भानसहिवरे येथील बेल्हेकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तंत्रनिकेतन मध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्रास महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाकडून शैक्षणिक वर्ष २०२६- २७ करिता मान्यता मिळालेली आहे. यंदाच्या प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेशासाठी २० मे पासून ऑनलाईन प्रवेश सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहे विद्यार्थ्यांनी २० मे ते २२ जून पर्यंत ऑनलाईन नोंदणी करावी तसेच कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी याची माहिती प्राचार्य एच. जे. आहिरे यांनी दिली. पदवीकाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी या सुविधा केंद्रात विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश नोंदणी तसेच अभ्यासक्रमाची निवड करता येईल. विद्यार्थांना रजिस्ट्रेशन करणे, कागदपत्र पडताळणी करून देणे, ऑपशन भरणे यासाठी ज्ञानेश्वर पॉलिटेक्निक मध्ये सुविधा केंद्र FC5248 सुरु झाले आहे, तसेच येथे अद्ययावत संगणकीय साधन सामुग्री, पुरेशा क्षमतेने इंटरनेट सुविधा, प्रशिक्षित व योग्य संवाद साधणारा प्राध्यापक वर्ग इत्यादी बाबी आहेत. विद्यार्थिना याकेंद्रामार्फत त्यांचा कल आणि सध्या मागणी असलेल्या पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहेत. तज्ज्ञ प्राध्यापक वर्गमार्फत जातीनिहाय संवर्गनुसार आवश्यक कागदपत्रे या संदर्भात सखोल माहिती येथे मिळणार आहे.


WANTED EX-SERVICEMEN

At Dhoki Toll Plaza

Ahilyanagar Section NH-222

(New NH-61)

K.M. 161.212 To K.M. 210.527

Contractor: MD Yousuf Ali

Send your resumes to:

dhokifeeplaza@gmail.com



जाहीर पेपर नोटीस

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...

१) बबन मारुती दातखिळे,
रा.टाकळी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर....**अर्जदार**

**विरुध्द....** १.परसराम लक्ष्मीनारायण, २. मोहनलाल रतनचंद,
३. मनसुखलाल रतनचंद, सर्व रा. टाकळी, ता. अकोले, जि. अहिल्यानगर...**सामनेवाले**

या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, बबन मारुती दातखिळे, रा. टाकळी, ता. अकोले, यांनी मौजे टाकळी, ता. अकोले येथील स.नं ७६/६ (जुना स.नं.७६/४) या जमिनीचे ७/१२ वरील इतर हक्कातील कालबाह्य नावे कमी होणेबाबत विनंती अर्ज दिनांक ०१/१२/२०२५ रोजी दाखल केलेला आहे.

सदर अर्जाबाबत दिनांक १६/०६/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले येथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. तरी अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जाबाबत कोणाचे काही म्हणणे असल्यास कागदपत्रासह सदर दिनांकास उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत कुणाचेही काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमूद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्रव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर नोटीस आज दिनांक १९/०५/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
तहसिलदार अकोले तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

EQJ COURT C-SE NO. 0045/2026
अकोले, दिनांक १९/०५/२०२६


# विधिज्ञांनी विजयी केले त्यांच्या अडचणी सोडविणार

**अँड. यदुपत अर्धापूरकर**



अर्धापूर : (स. गांवकरी)

जिल्ह्यातील विधिज्ञांनी आमच्या पॅनलवर विश्वास दाखवून मोठ्या मताधिक्यांनी आम्हाला विजयी केले आहे.येणाऱ्या काळात सर्व विधिज्ञांचे व नागरिकांच्या अडचणींत आम्ही धावुन जाणार आहोत,प्रत्येक अडचणी सोडविण्यासाठी प्राधान्य देण्यात येईल.तालुका न्यायालय अर्धापूर येथे अधिवक्ता संघांनी केलेला सत्कार हा आमच्यासाठी खूप अविस्मरणीय आहे असे प्रतिपादन नांदेड जिल्हा अधिव्यक्ता संघाचे अध्यक्ष अँड.यदुपत श्यामसुंदरराव देशमुख अर्धापूरकर यांनी तालुका न्यायालय अर्धापूर येथे केले.

तालुका न्यायालय येथे नवनिर्वाचित जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष,पदाधिकारी व सदस्यांच्या सत्कार सोहळ्यात नवनिर्वाचित अध्यक्ष अँड.यदुपत अर्धापूरकर,सचिव अँड.कपील पाटील,महिला उपाध्यक्ष अँड. दिपाली डोनगांवकर,महिला सहसचिव अँड. सुजाता बगाटे, कोषाध्यक्ष अँड. मंगेश जामनिक, सदस्य अँड.मुक्ता पवार,अँड. रामसिंग मठवाले,अँड. प्रिती हटकर, अँड.राजु हटकर,अँड. बाबु गावंडे, यांचे आगमन होताच फटाके फोडत ढोल,ताशे व बॅन्डच्या गजरात स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्धापूर न्यायालयाच्या आदरणीय न्यायाधीश श्रीमती.आर. बी.सोरेकर ह्या होत्या.सर्वप्रथम नवनियुक्त नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष अँड.यदुपत अर्धापूरकर यांचे आजोबा कै.अँड. श्यामसुंदरराव व्यंकटराव देशमुख अर्धापूरकर यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित सर्वांच्या हस्ते करून त्यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर नवनियुक्त नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष अँड.यदुपत श्यामसुंदरराव देशमुख अर्धापूरकर यांचा सत्कार या कार्यक्रमाच्या अध्यक्षा न्यायाधीश आर.बी.सोरेकर मॅडम यांच्या हस्ते करण्यात आला व त्यानंतर न्यायाधीश सोरेकर मॅडम यांचा सत्कार नवनियुक्त नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे अध्यक्ष अँड.यदुपत अर्धापूरकर यांच्या हस्ते करण्यात आला.त्यानंतर अधिवक्ता संघाचे कोषाध्यक्ष अँड.जी. बी.पत्रे,अधिवक्ता एकता पॅनलच्या अँड.मुक्ता पवार,अँड. दिपाली डोणगांवकर,अँड.

अभिजीत पांडे यांनी मनोगत व्यक्त केले यावेळी शेवटी अधिवक्ता संघाच्या वतीने जंगी स्वागत केले.

यावेळी बोलतांना नांदेड जिल्हा अधिवक्ता संघाचे नवनियुक्त अध्यक्ष अँड.यदुपत श्यामसुंदरराव देशमुख अर्धापूरकर म्हणाले की अर्धापूर हे माझे असून मी अर्धापूरचा आहे त्यामुळे वकिलांच्या बाबतीत मी कधीही कोणत्याच कामात कमी पडणार नाही.मी अध्यक्ष म्हणून निवडून येण्याच्या पुर्वीही वकिलांची कामे करित आलो,अध्यक्ष असतांनाही करणार व पुढे चालून अध्यक्ष नसतांनाही सर्वांचे कामे नेहमी करतच राहू असे आश्वासन उपस्थितांना दिले.

यावेळी उपस्थित अधिवक्ता संघाचे सचिव अँड.डि.एम. लोणे,ज्येष्ठ विधिज्ञ अँड.डि.बी.दासे, अँड.ए.आर.चाऊस,अँड.बी.व्ही. नवले,सहाय्यक सरकारी अभिवक्ता विशाल परदेशी,अँड.नितेश लोणे, अँड.दिलीप मोरे,राजेश्वर देशमुख, मुंजाजी कुर्हे,तजम्मुल खान यासह न्यायालयीन कर्मचारी गोविंद वाघमारे,राम चिकाळकर व इतर आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अधिवक्ता संघ सदस्य अॅड.गौरव सरोदे यांनी केले तर उत्कृष्ट आभार प्रदर्शन अॅड.सय्यद इम्रान यांनी करून हा कार्यक्रम नियोजनबद्ध रित्या सर्व विधिज्ञांनी यशस्वी पार पाडला.

## “वीजबिल शून्यावर” आणणारा विद्यार्थ्यांचा अभिनव सोलर प्रोजेक्ट



- सोनिया गांधी पॉलीटेक्निकच्या विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

तुळजा भवानी सेवा प्रतिष्ठान संचलित सोनिया गांधी पॉलीटेक्निकच्या इलेक्ट्रिकल विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अंतिम वर्ष प्रोजेक्ट अंतर्गत सौरऊर्जेवर आधारित अभिनव “सोलर पॅनल पॉवर सिस्टम” यशस्वीरीत्या विकसित करत महाविद्यालयाचे वीजबिल शून्यावर आणण्याचा स्तुत्य प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांच्या या पर्यावरणपूरक आणि कल्पक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या प्रकल्पामध्ये सौरऊर्जेच्या सहाय्याने विद्युत निर्मिती करून महाविद्यालयातील काही विद्युत उपकरणे चालविण्यात आली. वाढत्या वीजदराच्या पार्श्वभूमीवर पर्यायी ऊर्जास्रोतांचा प्रभावी वापर कसा करता येऊ शकतो, याचे उत्कृष्ट उदाहरण विद्यार्थ्यांनी या प्रकल्पातून सादर केले आहे. या प्रकल्पासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल नागवडे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विभागप्रमुख प्रविण बाबर आणि इलेक्ट्रिकल विभागातील इतर शिक्षकांनी सातत्याने तांत्रिक मार्गदर्शन करून प्रकल्प यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

## विविध प्रश्नांच्या संदर्भात सुनील वाघमारे यांनी सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाठ यांचे चर्चेद्वारे वेधले लक्ष

**विविध महामंडळाच्या लाभार्थ्यांचे कर्ज माफ करण्याची सुनील वाघमारे यांची मागणी**



नेवासा : (स. गांवकरी)

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री नामदार संजय शिरसाठ यांची नेवासा तालुक्यातील शिरसगाव येथील शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख सुनील वाघमारे यांनी भेट घेऊन शेतकरी,महिला, विद्यार्थी, अपंग व वंचीत घटकांच्या विविध प्रश्नांच्या संदर्भात झालेल्या चर्चेद्वारे लक्ष वेधले.यावेळी विविध महामंडळातील लाभार्थ्यांकडे असलेली थकबाकी माफ करून त्यांना नव्याने कर्जपुरवठा करण्यात यावा अशी मागणी दिलेल्या निवेदनात केली आहे.

यावेळी नामदार संजय शिरसाठ यांच्याशी झालेल्या चर्चे प्रसंगी सुनील वाघमारे यांनी मागासवर्गीय महामंडळ, महात्मा फुले महामंडळ,अण्णाभाऊ साठे महामंडळ, आदिवासी विकास महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ मधील सर्व थकबाकी माफ करून लाभार्थ्यांना नव्याने कर्जपुरवठा करावा,दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजनेसाठी दारिद्रय रेषेखालील अट वगळून त्यामध्ये मागासवर्गीय व भूमिहीनांना यातील योजनेचा लाभ मिळावा या संदर्भात चर्चा केली

राज्यातील वसतिगृहात अपंग व विधवा महिलांच्या मुलांना मोफत प्रवेश देण्यात यावा जेणेकरून त्यांच्या कुटुंबातील मुले ही शिक्षित होऊन त्यांच्या कुटुंबाचा भविष्यकाळात आधार बनू शकतील यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना मोठा दिलासा मिळेल असे झालेल्या चर्चेत मागणी केली.

यावेळी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष किशोर वाघमारे,उपाध्यक्ष विनोद साळवे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.झालेल्या चर्चेद्वारे मांडण्यात आलेल्या विविध प्रश्नांचे निवेदन सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाठ यांना देण्यात आले.

## दहशत माजवणारा बिबट्या पिंजऱ्यात जेरबंद

- अजून दोन बिबटे मुक्त संचारात असल्याची शक्यता
- रहिवासी भागात दहशत निर्माण करणारा बिबट्या पकडल्याने नागरिकांनी घेतला सुटकेचा निश्वास, वन विभाग सतर्क



डांग, गुजरात : (स. गांवकरी)

गुजरातमधील एकमेव हिल स्टेशन सापुतारा येथे गेल्या काही दिवसांपासून बिबट्याच्या मुक्त वावरामुळे स्थानिक नागरिक आणि पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर दहशत माजवणारा भला मोठा बिबट्या वन विभागाच्या पिंजऱ्यात अडकला असून नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. परवाच्या रात्री सापुताऱ्यातील सरोवर कॉलनीजवळ असलेल्या ‘कलाकृती आर्ट एम्पोरियम’ परिसरात एका बिबट्याने कुत्रीच्या पिलाची शिकार केली होती. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्यानंतर परिसरात खळबळ उडाली होती. रहिवासी भागात बिबट्याची वाढती हालचाल लक्षात घेता सापुतारा हॉटेल असोसिएशन आणि स्थानिक नागरिकांनी वन विभागाकडे तातडीने पिंजरे लावण्याची मागणी केली होती. या मागणीची गंभीर दखल घेत दक्षिण डांग वन विभागाचे डीसीएफ निरजकुमार यांनी तात्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शामगहान रेंजच्या आरएफओ मंजुलाबेन ठाकरे यांच्या पथकाने प्रभावित भागात दोन पिंजरे उभारले होते. वन विभागाची ही रणनीती यशस्वी ठरली आणि सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसलेला तोच खतरनाक नर बिबट्या अखेर पिंजऱ्यात जेरबंद झाला. वन विभागाच्या माहितीनुसार, पकडण्यात आलेल्या या नर बिबट्याचे वय अंदाजे ५ ते ६ वर्षे आहे. बिबट्या पकडल्यामुळे स्थानिक रहिवासी तसेच हॉटेल व्यावसायिकांनी मोठा दिलासा व्यक्त केला आहे. मात्र, धोका अद्याप पूर्णपणे टळलेला नाही. स्थानिक सूत्रे आणि वन विभागाच्या प्राथमिक अंदाजानुसार, परिसरात अजून दोन बिबटे मुक्तपणे फिरत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वन विभाग अधिक सतर्क झाला असून उर्वरित बिबट्यांना पकडण्यासाठी आणखी पिंजरे लावण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे.

## अनधिकृत प्रवासी वाहतुकीमुळे मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर !

- अपघाताची भीती वाढली, कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या अनधिकृत प्रवासी वाहतुकीमुळे मजुरांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विविध गोडाऊनमध्ये कामासाठी जाणाऱ्या मजुरांना अक्षरशः जनावरांसारखे वाहनांमध्ये कोंबून नेले जात असल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. कुरुंद येथील के-स्क्वेअर, मिंत्रा तसेच पडघा, डोहळे, कोशिंबी, कुरुंद, सापे, वाशेरे, आमणे, कुकसे, भोईरगाव, कुकसे बोरिवली, वडपे, येवई, सावद, लोणाड, भावाले आदी परिसरातील विविध गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर मजूर कामासाठी ये-जा करतात. मात्र या मजुरांच्या वाहतुकीसाठी नियमबाह्य पद्धतीने रिक्षा, छोटा हत्ती आणि टेम्पो वाहनांचा वापर केला जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि कामगार संघटनांकडून करण्यात आला आहे. माहितीनुसार, एका रिक्षामध्ये तब्बल १० ते १२ मजूर तर छोटा हत्ती आणि टेम्पो वाहनांमध्ये १८ ते २० मजूर कोंबून दिवस-रात्र वाहतूक केली जात आहे. अनेक वाहनांची कागदपत्रे अपूर्ण असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, काही वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र, विमा तसेच परवानेही संपलेले असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे अशा धोकादायक वाहतुकीमुळे मोठा अपघात होऊन निष्पाप मजुरांचा जीव जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# स्थानिक प्राधिकार मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

## १८ जून रोजी मतदान ; जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू, प्रशासन सज्ज



नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांच्यासह विविध माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, निवडणुकीची अधिसूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ असून, अर्जांची छाननी २ जून रोजी करण्यात येईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार असून, मतमोजणी २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकारी संस्थांच्या प्रतिनिधींमधून या मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. सध्या मतदारसंघात एकूण १७ कार्यरत स्थानिक प्राधिकारी संस्था असून, मतदारांची संख्या ४३२ इतकी आहे. अंतिम यादीपर्यंत या संख्येत वाढ होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. या निवडणुकीसाठी मतदान केंद्राची संख्या 8 राहणार असून, नांदेड जिल्ह्यातील सर्व उप विभागाच्या मुख्यालयी तहसिल कार्यालयात प्रत्येकी एक मतदान केंद्र राहणार आहे. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांनी नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ विधान परिषद निवडणूक, मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रम २०२६ बाबत सविस्तर माहिती दिली. मतदार नोंदणी, दुरुस्ती आणि पडताळणी प्रक्रियेबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व संबंधितांना केले. आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता राजकीय पक्ष, स्थानिक संस्था आणि प्रशासनाने घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.


# बोट व आयशचर वाहन जप्त, गुन्हा दाखल

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



ऑपरेशन क्रॅकडाऊन अंतर्गत गोदावरी नदीपात्रातील अवैध रेती उपसा करणाऱ्या ईसमावर ग्रामीण पोलीसांनी छापा कारवाई करुन एकुण 1,00,25,000/- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त केला असून या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैध रेती व्यवसाय करणारे इसमावर कार्यवाही करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशित केले होते. त्या अनुषंगाने ओमकांत चिचोलकर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड व सोबत पथकातील अंमलदार हे दिनांक 17मे 26 रोजी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण हद्दीत अवैध धंदयाची माहीती काढून कारवाई कामी पेट्रोलीग करीत असतांना त्याना गोपनीय माहीती मिळाली की, इंजेगाव व बोंढार शिवारातील गोदावरी नदीपात्रात वर नमुद आरोपी हे गोदावरी नदीपात्रातील रेती अवैधपणे उपसा करुन तराफ्याच्या साहयाने काठावर आणुन त्याचा साठा करुन त्या ठिकाणावरुन रेतीची वाहतुक करीत आहेत अशी खात्रीशीर माहीती मिळाल्याने नमुद अधिकारी व अंमलदार हे मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी वेळ 12 वाजण्याच्या सुमारास इंजेगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात छापा कारवाई करुन तेथील अवैध रेती साठा, 20 तराफे, 6 इंजीन वर कारवाई करीत असताना कारवाईची माहीती ही बोंढार शिवारातील गोदावरी पात्रात अवैध रेती उपसा करणारे इसमांना लागल्याने सदरचे इसम हे क्रेन च्या सहयाने नदीतील रेती उपसा करणारी बोट ही आयशर वाहनात टाकुन इतर ठिकाणी घेवून जात असताना वर नमूद अधीकारी व अंमलदार यांनी वर नमूद आरोपीच्या ताब्यातून एक बोट, एक आयशर वाहन, एक क्रेन ही पंचासमक्ष जप्त करुन इंजेगाव व बोंढार या ठिकाणी अवैध रेती उपसा करणाऱ्या वर कार्यवाही करुन एकुण 1,00,25,000/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन आरोपीविरुध्द वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.



शिवनेरी वार्ताहर : माणिकडोह व पिंपळगाव जोगे धरणातील पाणीसाठा टक्केवारी चिंताजनक झाली आहे. यामुळे या परिसरातील धरण क्षेत्रातील शेतकरी कुटुंब मुक्या जनावरांसाठी व पाणी पिण्यासाठी दररोज पायपीट करावी लागत आहे. येथील विद्यार्थी पाण्यासाठी दररोज घराबाहेर पडायला लागत असल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. यामुळे या भागातील परिस्थिती चिंताजनक झाली आहे.

# अवैध व्यवसायाविरोधात पोलिसांचा दणका

- गुटखा जप्तीची मोठी कारवाई
- पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाची धडक मोहीम
- लाखोंचा मुद्देमाल जप्त, अनेकांवर गुन्हे दाखल

नायगाव: (स. गांवकरी)



नायगाव तालुक्यातील व नांदेड परिक्षेत्रात अवैध व्यवसायांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेला वेग आला असून, पोलीस उपमहानिरीक्षकांच्या पथकाने कुंटूर येथे धडक कारवाई करत लाखो रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध गुटखा विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. दि. ९ ते ३१ मे २०२६ या कालावधीत नांदेड परिक्षेत्रात अवैध धंद्यांविरोधात व्यापक मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या १५ व्या दिवशी पोलीस उपमहानिरीक्षकांच्या अधिपत्याखालील पथकाने नांदेड जिल्ह्यातील कुंटूर परिसरात सापळा रचून मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे २ लाख ४७ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यास दहा वर्षांपर्यंत कारावास व दंडाची तरतूद असल्याचे पोलिसांनी सांगितले. याचबरोबर मटका-जुगार प्रकरणी १० इसमांविरोधात महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्याकडून ४५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अवैध दारू विक्री करणाऱ्या २७ जणांविरोधात २४ गुन्हे दाखल करून १० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरोधातही कारवाई करत दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून, सुमारे ४६ लाख ११ हजार ८०२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. या विशेष मोहिमेदरम्यान शस्त्र अधिनियम व कोटपा कायद्यांतर्गतही कारवाया करण्यात आल्या असून, एकूण ४४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विविध कारवायांमधून एकूण ६५ लाख ७१ हजार ४२६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान, अवैध व्यवसायांची माहिती देण्यासाठी पोलीस प्रशासनाने 'खबर' हेल्पलाईन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या परिसरातील अवैध धंद्यांची माहिती मोबाईल क्रमांक ११५०१००१०० वर फोन अथवा व्हॉट्सॲपद्वारे द्यावी, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# यूडब्ल्यूए इंडियाकडून ऐतिहासिक शिष्यवृत्ती उपक्रमाची घोषणा

पुणे : (स. गांवकरी)

ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाने यूडब्ल्यूए इंडियाच्या माध्यमातून भारतासाठी मोठ्या शिष्यवृत्ती उपक्रमाची घोषणा केली आहे. भारतातील विद्यार्थ्यांसाठी जागतिक दर्जाचे शिक्षण अधिक सुलभ आणि परवडणारे करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत विविध शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कामध्ये सवलत देण्यात येणार आहे. गुणवत्ता, आर्थिक गरज, नेतृत्व क्षमता आणि प्रादेशिक समावेशकता या निकषांवर शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे कुलगुरू प्रा. अमित चकमा म्हणाले की, भारतातील विद्यार्थ्यांसाठी जागतिक स्तरावरील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या स्वप्नांना मर्यादा येऊ न देणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे. भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक करिअरसाठी सक्षम बनविण्यावर विद्यापीठाचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. यूडब्ल्यूए इंडियासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून मुंबई आणि चेन्नई येथील परिसरांमध्ये विज्ञान-तंत्रज्ञान, व्यवसाय आणि तंत्रज्ञान विषयांतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. हे अभ्यासक्रम जागतिक उद्योगांच्या गरजा आणि भारतातील बदलत्या रोजगार क्षेत्राशी सुसंगत असतील.

# हिंदुस्तान झिंकच्या राजपुरा दरीबा संकुलाला केंद्रीय खाण मंत्र्यांची भेट

पुणे : (स. गांवकरी)



राजस्थानमधील राजपुरा दरीबा संकुलात केंद्रीय कोळसा व खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी भेट देत भूमिगत खाणकाम, धातू निर्मिती प्रक्रिया आणि सामाजिक विकास उपक्रमांचा आढावा घेतला. या दौऱ्यात त्यांनी सिंदेसर खुर्द भूमिगत खाण तसेच दरीबा धातू प्रक्रिया संकुलाची पाहणी केली. सिंदेसर खुर्द खाण ही अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित भूमिगत खाण मानली जाते. येथे सुरक्षितता, दूरस्थ नियंत्रण प्रणाली आणि आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून खाणकाम केले जाते. मंत्र्यांनी नियंत्रण विभागाला भेट देत प्रत्यक्ष कार्यपद्धतीची माहिती घेतली. महिला खाण बचाव पथकाचे प्रात्यक्षिक पाहून मंत्र्यांनी महिलांच्या सहभागाचे कौतुक केले. खाण क्षेत्रात सुरक्षितता, कौशल्यविकास आणि सर्वसमावेशकतेला कंपनीने दिलेले प्राधान्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले. दरीबा धातू प्रक्रिया संकुलामध्ये खाणकामापासून धातू निर्मितीपर्यंतची एकात्मिक प्रक्रिया पाहून मंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. कंपनीत मोठ्या प्रमाणावर महिला कर्मचारी कार्यरत असून विविध क्षेत्रांत त्यांचे नेतृत्व दिसून येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी बोलताना जी. किशन रेड्डी म्हणाले की, विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना देशातील खनिज संपत्ती आणि तंत्रज्ञानाधारित उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतील. स्वावलंबी औद्योगिक व्यवस्था उभारण्यासाठी जबाबदार खाणकाम आणि देशांतर्गत उत्पादन वाढ आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या भेटीदरम्यान महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य सेवा, शुद्ध पिण्याचे पाणी, ग्रामीण क्रीडा आणि युवक प्रशिक्षण यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहितीही मंत्र्यांना देण्यात आली.

# तुषार बोथरा पोलीसच्या ताब्यात, वंचितचे तीव्र आंदोलन

जामखेड : (स. गांवकरी)



आज दि.19 में 2026 रोजी जामखेड येथील येथील रहिवाशी तुषार बोथरा या इसमाने फेसबुक या सोशल मिडीया प्लॅटफार्मवर एक अत्यंत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक कमेंट केली आहे. सदर कमेंट ही वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांचे चिरंजीव तसेच पक्षाचे राज्याचे नेते आदरणीय सुजात दादा आंबेडकर यांच्याबाबत करण्यात आली आहे. याप्रकरणी वंचित बहुजन आघाडी जामखेड तालुक्याच्या वतीने वंचितचे राज्य प्रवक्ते एडवोकेट डॉ.अरूण (आबा) जाधव यांच्या नेतृत्वाखाली जामखेड पोलिस स्टेशन येथे तीव्र स्वरूपात निदर्शने करून आंदोलन करण्यात आले आहे.या अत्यंत खालच्या पातळीवरील कमेंटमुळे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि वारसाचा घोर अपमान झाला असुन,संपूर्ण आंबेडकरी जनतेच्या भावना तीव्रतेने दुखावल्या गेल्या आहेत.या वादग्रस्त व्यक्तव्यामुळे जामखेड शहर व परिसरातील आंबेडकरी समाजात तीव्र संतापाची लाट असुन,शांतता व सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.प्रशासनाने या घटनेचे गांभीर्य ओळखून कायदा व सुव्यवस्था बिघडण्यापूर्वी सदर इसम तुषार बोथरा याच्यावर आयटी अॅक्ट व संबंधित कायदेशीर कलमांनुसार तात्काळ गुन्हा दाखल करावा आणि त्याला ताब्यात घ्यावे.

अशी मागणी वंचित बहुजन आघाडी जामखेड तालुक्याच्या वतीने करण्यात आली आहे.जर या इसमावर त्वरित कडक कार्यवाई झाली नाही तर वंचित बहुजन आघाडी व समस्त आंबेडकरी जनतेच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल,ज्याची सर्वस्वी जबाबदारी पोलिस प्रशासनाची राहील असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या या तीव्र आंदोलनामुळे जामखेड पोलिसांनी तातडीने दखल घेऊन सदर आरोपी तुषार बोथरा याला अटक केली आहे. वंचितच्या या तीव्र आंदोलनाला राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट),संभाजी ब्रिग्रेड,मुस्लिम पंच कमिटी,लोकशाहीर आण्णाभाऊ साठे युवा मंच,ओबीसी संघटना आदिंनी जाहीर पाठिंबा देत सदरील घटनेचा निषेध केला आहे.या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते नगरसेवक एडवोकेट डॉ.अरूण (आबा) जाधव,जामखेड नगरपरिषदेच्या नगसेविका सौ.संगिताताई भालेराव,नगरसेवक प्रशांत राळेभात,नगरसेवक वसीम सय्यद,मुस्लिम पंच कमिटीचे अध्यक्ष अझहरभाई काझी,संभाजी ब्रिग्रेडचे अवधूत पवार,वकील बार संघटनेचे अध्यक्ष एडवोकेट हर्षल डोके,भारतीय बौध्द महासंघाच्या सुरेखाताई सदाफुले,लोकशाहीर आण्णाभाऊ साठे युवा मंचचे अध्यक्ष गणेश जाधव,सामाजिक कार्यकर्ते पत्रकार रिजवान बागवान,लोकअधिकार आंदोलनाचे बापू ओव्हळ,मुख्तार सय्यद,जुबेर शेख,अंकल घायतडक,नितिन जाधव,सतिष जाधव,परशुराम,जाधव,आदिल शेख,दिलिप गायकवाड,सुमित भालेराव,अक्षय समुद्र,मनोज घायतडक,शेखर कांबळे,योगेश बनसोडे,आरीफ बागवान,सुभाष फुलमाळी सर,विक्की गायकवाड,गणेश घायतडक,बाबा ओव्हळ,अनिल सदाफुले,सागर कांबळे आदि.पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येंने उपस्थित होते. या आगोदरही मुस्लिम समाजाच्या पवित्र रमजान महिन्यात ही समाजाच्या भावना दुखतील असे या तुषार बोथरा यांनी वक्तव्य वापरले होते.

# 'एमआयटी एडीटी'च्या विद्यार्थ्यांची ऐतिहासिक कामगिरी!

- भारतातील सर्वात मोठ्या रेडिओ-कंट्रोल्ड इलेक्ट्रिक विमानाची यशस्वी निर्मिती
- 'प्रोजेक्ट गरुडा'ची इंडिया व आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद

पुणे : (स. गांवकरी)



भारतीय विद्यार्थी संशोधन आणि एरोस्पेस नवोन्मेष क्षेत्रात ऐतिहासिक ठरणारी कामगिरी करत 'एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी' विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भारतातील सर्वात मोठे रेडिओ-कंट्रोल्ड (आरसी) इलेक्ट्रिक फिक्स्ड-विंग विमान यशस्वीरीत्या डिझाईन, विकसित आणि उड्डाण केले आहे. 'टीम स्कायट्रेक'ने विकसित केलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला 'प्रोजेक्ट गरुडा' असे नाव देण्यात आले आहे. 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड सायन्स अंतर्गत एरोस्पेस इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थ्यांनी हे विमान पूर्णपणे स्वतः विकसित केले असून, या प्रकल्पासाठी 'सेंटर फॉर रिसर्च, इनोव्हेशन अँड एंटरप्रेन्युअरशिप फॉर यंग ॲस्पिरंट्स' (CRIEYA) मार्फत विद्यापीठाने अर्थसहाय्य केले आहे. ९.२५ मीटर एवढ्या विशाल विंगस्पॅनसह आणि २६१ किलो वजन असलेले हे विमान भारतात तयार झालेले सर्वात मोठे आणि सर्वाधिक वजनाचे रेडिओ-कंट्रोल्ड इलेक्ट्रिक विमान ठरले आहे. या प्रकल्पासाठी 'CRIEYA'कडून तब्बल ४८ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.

यशस्वी उड्डाणानंतर या विमानाची आता 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' व 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये भारतातील सर्वाधिक वजनाचे आरसी विमान (२६१ किलो) आणि भारतातील सर्वांत मोठ्या विंगस्पॅनचे आरसी विमान (९.२५ मीटर) अशा विक्रमांसाठी नोंद झाली आहे. एमआयटी एडीटी विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेत 'इंडिया व आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'च्या अधिकाऱ्यांकडून 'प्रोजेक्ट गरुडा'ला विक्रमाचे प्रमाणपत्र बहाल करण्यात आले. त्यामुळे पूर्णपणे विद्यार्थ्यांनी साकारलेला हा प्रकल्प अनुभवाधारित शिक्षण, प्रगत एरोस्पेस संशोधन आणि विद्यार्थी-केंद्रित नवोन्मेषाचे उत्कृष्ट उदाहरण ठरला आहे. या प्रकल्पाला 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच कुलगुरू डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ. सायली गणकर, प्र-कुलगुरू (टेक्नॉलॉजी क्लस्टर) डॉ. रामचंद्र पुजेरी, प्र-कुलगुरू (इनोव्हेशन क्लस्टर) डॉ. मोहित दुबे, प्र-कुलगुरू (क्रिएटिव्ह क्लस्टर), कुलसचिव डॉ.महेश चोपडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. अभियांत्रिकी विभागाचे अधिष्ठाता डॉ. सुदर्शन सानप, एरोस्पेस विभागप्रमुख डॉ. कमलेश कुलकर्णी, डॉ. सुनील डिंगरे तसेच CRIEYAचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संतोष दराडे यांनी सातत्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विमानाची रचना, स्ट्रक्चरल फॅब्रिकेशन, एरोडायनॅमिक्स आणि स्थैर्य विश्लेषण, पिक्सहॉक फ्लाइट कंट्रोलर प्रणाली, आरटीके-जीपीएस आधारित नेव्हिगेशन, इलेक्ट्रिक प्रोपल्शन सिस्टीम, फ्लाइट टेस्टिंग, रिमोट पायलटिंग, स्ट्रक्चरल व्हॅलिडेशन आणि प्रोपल्शन ऑप्टिमायझेशन ही सर्व कामे स्वतंत्रपणे पार पाडली.

## थोडक्यात बातम्या...



### वनबिटातील राखिव वनक्षेत्रातुन शेकडो सागवान झाडाची चोरी

अर्धापूर (स. गांवकरी) : नांदेड वनपरिक्षेत्रातील वनपरिमंडळ अर्धापूर वनबिट मौ.चेणापुर,मौ.पाटणुर येथील राखिव वनक्षेत्रात मौल्यवान सागवान वृक्षाचे भरमसाट वनक्षेत्र आहे,पण त्यांचे संगोपन करणारे वनरक्षक, वनपाल,हे विटांच्या गावी कधीच हजर राहत नसल्याने चेणापुर बिटातील शिवार हत्ती माथा,व पाटणुर वनबिटातील अर्धापूर ते तामसा रोड लगत दिवसा ढवळ्या शेकडो सागवान वृक्षाची अवैध कत्तल करून वन तस्करांनी मोठा डल्ला मारला आहे, नांदेड वनपरिक्षेत्रात गेल्या विस पंचवीस वर्षांत एवढी मोठी अवैध जंगल तोड कधीच झाली नाही,सदरिल घटणा ताजी असतांना नांदेड वनविभागाचे उपवनसंरक्षक, सहाय्यक वनसंरक्षक, आणि वनपरिक्षेत्र अधिकारी, या प्रकरण गंभीर दिसत नसल्यामुळे अद्याप कोणत्याही अधिकार्यांनी पहाणी किंवा कारवाई केल्याचे दिसून येते नाही,या प्रकरणात कर्मचार्यां सह वरीष्ठ अधिकारी सुध्दा मुग गिळून गप्प का आहेत, अशा चर्चेला लहान, अर्धापूर परिसरात उधान आले आहे, या प्रकरण संभाजी नगर येथील मुख्य वनसंरक्षक प्रमोदचंद लाकरा यांच्या कडे गेले असुन ते कोना कोनाला जबाबदार धरून काय कारवाई करतील, या कडे मौ.लहान, अर्धापूर येथील वनप्रेमी व जनतेचे लक्ष लागले आहे.

### हवामान विभागाच्या सूचना जिल्ह्यात 20 मे रोजी येलो अलर्ट जारी

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि २० मे या दिवशी येलो (Yellow) अलर्ट जारी केलेला आहे. दि २० मे रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाट असण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. तहान नसली तरी पुरेसे पाणी प्या. अपस्मार, हृदयरोग, मूत्रपिंड, यकृतविषयक आजारांमुळे ज्यांना शरीरात द्रवपदार्थ टिकवण्याचा प्रश्न येतो, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानंतरच द्रवपदार्थ किंवा पाणी प्राशन करावे. ओआरएस (ORS) म्हणजेच तोंडान घ्यावयाचे शरीरातले पाणी वाढवणारे द्रवपदार्थ, घरगुती लस्सी, भाताची पेज, लिंबूपाणी, ताक, नारळाच पाणी घ्या. हलक्या रंगाचे, वजनाला हलके आणि सैलसर सुती कपडे वापरा. घराबाहेर असाल तर डोके झाका. एखादे कापड वापरा, टोपी घाला किंवा छत्री वापरा. डोळ्यांच्या सुरक्षेसाठी गॉगल वापरा आणि उन्हापासून कातडीचाही बचाव करायला सनस्क्रीन वापरा. अतिउष्णतेमुळे ज्यांना सर्वाधिक हानी पोहोचेल असे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी किंवा स्थूल व्यक्तींची विशेष काळजी घ्या. उन्हात जायचे टाळा, विशेषतः दुपारी १२ ते ०३ मध्ये दुपारी बाहेर असताना श्रमाची कामे टाळा. अनवाणी बाहेर जाऊ नका. अतिउष्णतेच्या काळात स्वयंपाक करणे टाळा. दारं खिडक्या उघड्या ठेऊन अन्न शिजवण्याचे क्षेत्र स्वयंपाकघर हवेशीर राहील हे बघा. अल्कोहोल म्हणजे दारू, चहा, कॉफी, शीतपेये टाळा त्यातून शरीरातले पाणी कमी होते. उच्च प्रथिनयुक्त मिठाचं प्रमाण जास्त असलेले किंवा तिखट तसेच तेलकट अन्न खाऊ नका. शिळंपाकं खाऊ नका. चारचाकी वाहन लावून ठेवताना त्यात लहान मुले किंवा प्राणी ठेऊ नका. चमकणारे दिवे किंवा बल्ब्ज वापरू नका, त्यातून अनावश्यक उष्णता निर्माण होते.



### सामाजिक बांधिलकीतून गोशाळांना १२ टन हिरव्या चाऱ्याचे मोफत वाटप!

राजगुरुनगर(स. गांवकरी) : सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशन, च्या वतीने मुक्या जनावरांसाठी "चारा वाटप उपक्रम" अत्यंत यशस्वीपणे राबविण्यात येत असून, तालुक्यातील चार प्रमुख गोशाळांना तब्बल १२ टन हिरवागार मक्याचा चारा मोफत देण्यात आला आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने नागरिक हवालदिल झाला आहे. वाढत्या तापमानामुळे पाणी टंचाई, जनावरांसाठी चारा प्रश्न निर्माण होऊन मुक्या जनावरांचे हाल होऊ नयेत,व गोशाळांमधील गोधनाची उपासमार होऊ नये, यासाठी हुतात्मा राजगुरू फाऊंडेशनने दरवर्षी प्रमाणे पुढाकार घेत तालुक्यातील ४ प्रमुख गोशाळांमध्ये एकूण '१२ टन' दर्जेदार हिरव्यागार मक्याच्या चाऱ्याचे वाटप करण्यात आले.* ऐन उन्हाळ्यात गोधनासाठी हिरवा सुग्रास चारा मिळाल्याने गोशाळा प्रशासनाने फाऊंडेशनच्या या उपक्रमाचे मोठे कौतुक करून आभार मानले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)